अर्थनियोजन

प्र.1) एका वस्तूवरील CGST चा दर 6% असेल, तर SGST चा दर किती ? तसेच GST चा दर किती ?

उत्तर :CGST चा दर = 6%

∴ SGST चा दर = 6%

म्हणून , CGST आणि SGST हे दोन्ही कर समान असतात .

∴ GST चा दर =6% + 6% = 12%

प्र.2) ‘ मसर्स रियल पेंट ’ ने प्रत्येकी 1800 करपात्र किमतीचे लस्टर पेंटचे डबे 2 विकले . GST चा दर 18% असल्यास कर बीजकात CGST व SGST किती रुपये आकारला असेल ?

उत्तर- एकू चीविक्री किंमत $= 2 \times 1800 = 3600$

करपात्र किंमत 3600% =

GST चा दर 18% =

∴ CGST चा दर =SGST चा दर $= \frac{1}{2} \times 18\% = 9\%$

CGST = $3600 \times \frac{9}{100} =$ रु. 324

SGSTरु. 324 =

CGST आणि SGST प्रत्येकी रुपये आकाराला असेल 324

Q. 3) खेळण्यासाठी एका रिमोट कंट्रोल कारची जीएसटी करासह एकूण किंमत रु.1770 आहे. जीएसटीचा दर 18% आहे , तर त्या कारची करपात्र किंमत, त्यावरील CGST आणि SGST चे गणन करा

उत्तर :

कारची एकूण किंमत रु. **1770** दिली आहे

या किंमतीवर 18% दराने जीएसटी भरला आहे .

एकूण किंमत = रु. **100** + रु. **18** = रु. **118**

$\frac{\text{एकूण किंमत}}{\text{करपात्र किंमत}}$ यांचे गुणोत्तर समान असते

कारची एकूण करपात्र किंमत **x** मानू ,

म्हणून, $\frac{x}{1770} = \frac{100}{118}$

करपात्र किंमत = $1770 \times \frac{100}{118}$ = रु. **1500**

GST 18% आहे = $\frac{18}{100} \times 1500$ = रु. **270**

CGST = $\frac{270}{2}$ = रु. **135** आणि **SGST** = रु. **135**

उत्तर . खेळण्यातील कारची करपात्र किंमत रु. 1500, त्यावरील **CGST** रु. **135** आणि **SGST** रु. **135** आहे

Q. 4) प्रसादने " महाराष्ट्र इलेक्ट्रॉनिक्स गुड्स " मधून रु. 40,000 छापील किंमतीचे वॉशिंग मशीन विकत घेतले . त्यावर दुकानदाराने 5 % सूट दिली. जीएसटी दर 28% आहे ; तर प्रसादला ते वॉशिंग मशीन किती रुपयांस मिळाले **?** कर बीजकात **CGST** व **SGST** किती रुपये असेल ते काढा .

रीत :

वॉशिंग मशिनची छापील किंमत रु. 40,000 आहे

यावर 5 % सूट मिळाली .

मिळालेली सूट = $\frac{5}{100} \times 40000 = \text{रु.}\, 2000$

छापील किंमतीतून सूट वजा करून करपात्र किंमत काढू.

करपात्र किंमत = $40000 - 2000 = \text{रु.}\, 38{,}000$

या करपात्र किंमतीवर GST आकारला आहे.

जीएसटी दर 28% आहे

एकूण GST = $\frac{28}{100} \times 38000 = \text{रु.}\, 10640$

प्रसादला द्यावी लागणारी एकूण किंमत

= करपात्र किंमत + जीएसटी

= 38,000 + 10,640 = रु. 48,640

$CGST = SGST = \frac{1}{2} \times GST$

$CGST = SGST = \frac{1}{2} \times 10640 = \text{रु.}\ 5320$

उत्तर : प्रसादला ते मशीन 48640 रुपयांना मिळेल व बिलावर CGST आणि SGST प्रत्येकी रु. 5320 दाखवला असेल

Q. 5) प्रेरणा स्टोर्सने 01 जुलै 2017 ते 31 जुलै 2017 या कालावधीत केलेल्या खरेदीवर रु. 1,12,500 GST दिला व विक्रीवर रु. 1,42,500 GST गोळा केला ; तर सदर कालावधीत प्रेरणा स्टोअर्सला भरावा लागणारा देय GST काढा .

रीत :

प्रेरणा स्टोअर्सचा इनपुट टॅक्स क्रेडिट = रु. 1,42,500

चेतना स्टोअर्सचा आउटपुट टॅक्स रु. 1,22,500, आहे चे

चेतना स्टोअर्सचा देय GST = आउटपुट टॅक्स - ITC

= 142500 – 112500

= रु. 30000

उत्तर . चेतना स्टोअर्सला रु. 30,000 जीएसटी देय आहे

Q. 6) अमीर एंटरप्राइझने सॉसच्या बाटल्या खरेदी करताना रु. 3500 GST भरला आणि त्या अकबरी ब्रदर्सला विकताना रु. 4000 GST गोळा केला . मयंक फूड कॉर्नरने अकबरी ब्रदर्स कडून त्या बाटल्या रु. 4900 GST देऊन विकत घेतल्या , तर प्रत्येक व्यवहारात देय GST काढा . त्यावरून प्रत्येकाला भरावा लागणारा केंद्राचा देय कर (CGST) व राज्याचा देय कर (SGST) काढा

रीत :

अमीर एंटरप्राइझेस : आऊट टॅक्स = रु. 4000

इनपुट टॅक्स = रु. 3500

एंटरप्राइझेस देय GST = आऊट टॅक्स – ITC

= 4000 – 3500

= रु. 500

अकबरी ब्रदर्स:

आऊट टॅक्स = रु. 4900

इनपुट टॅक्स = रु. 4000

अकबरी ब्रदर्स देय GST = आऊट टॅक्स – ITC

= 4900 – 4000

= रु. 900

Company	GST देय	CGST देय	SGST देय
अमीर एंटरप्राइझेस	रु. 500	रु. 250	रु. 250
अकबरी ब्रदर्स	रु. 900	रु. 450	रु. 450
एकूण	रु. 1400	रु. 700	रु. 700

Q. 7) पुढे दिलेल्या माहितीवरून दुकानदार ते ग्राहक (B2C) यासाठीचे करबीजक (टॅक्स इनवॉइस) तयार करा. नाव , पत्ता , तारीख इत्यादी तुमच्या पसंती नुसार घ्या .

पुरवठादार : मे. .... पत्ता ....

राज्य .... तारीख ....

इनवॉइस क्रमांक .... GSTIN ....

वस्तूचा तपशील : मोबाइल बॅटरीचा दर - रु. 200 1 नग GST चा दर 12%, HSN 8507

हेडफोनचा दर – रु. 750 1 नग GST चा दर 18% HSN 8518

रीत :

मोबाइल बॅटरीचा GST दर = 12%

CGST = SGST चा दर = 6%

हेडफोनचा चा GST दर 18%

CGST = SGST चा दर = 9%

वस्तू खरेदीचा टॅक्स इनवॉइस

पुरवठादार : M/s क्लासिक इलेक्ट्रॉनिक्स **GSTIN : 27ACPRS1958L1Z5**

28/29, XYZ रोड मुंबई : 400 028,

Maharashtra

इनवॉइस क्रं. GST/001 **इनवॉइस तारीख : 05-Aug-2018**

Sr. No.	HSN Code	Name of Product	Rate	Quantity	Taxable Amount (Rs.)	CGST		SGST		Total (Rs.)
						Rate	Tax (Rs.)	Rate	Tax (Rs.)	
1	8507	मोबाइल बॅटरी	रु. 200 प्रत्येकी	1	200	6%	12	6%	12	224
2	8518	हेडफोन	रु.. 750 प्रत्येकी	1	750	9%	67.5	9%	67.5	885
						एकूण	**79.5**		**79.5**	**1109**

Q. 8) जॉइय यांनी पुढीलप्रमाणे शेअर्स मध्ये गुंतवणूक केली , तर त्यांनी केलेली एकूण गुंतवणूक काढा .

कंपनी X: दर्शनी किंमत रु. 2 आणि अधिमूल्य रु. 18 असलेले 100 शेअर्स

कंपनी Y: बाजारभाव रु. 50 असलेले 400 शेअर्स

कंपनी Z: बाजारभाव रु. 7520 असणारा 2 शेअर

रीत:

कंपनी X: 100 शेअर्स , दर्शनी किंमत = रु. 2, अधिमूल्य = रु. 18

बाजारभाव = दर्शनी किंमत + अधिमूल्य

= रु. 2 + रु. 18 = रु. 20

कंपनी X मधील गुंतवणूक = शेअरसंख्या x बाजारभाव

= 100 x 20

= रु. 2000 ... (1)

कंपनी Y : 50 शेअर्स, बाजारभाव = रु. 400

कंपनी Y मधील गुंतवणूक = शेअरसंख्या x बाजारभाव

= 50 x 400

= रु. 20,000 ...(2)

कंपनी Z: 1 शेअर , बाजारभाव = रु. 7520

कंपनी Z मधील गुंतवणूक = रु. 15,040 ...(3)

(1), (2) आणि (3) वरुन

एकूण गुंतवणूक = (2000 + 20000 + 15040)

= रु. 37,040

उत्तर . जोसेफ यांची एकूण गुंतवणूक रु. 37,040 आहे

Q. 9) पुढील पैकी कोणती गुंतवणूक फायदेशीर आहे ? दोन्ही कंपनीच्या शेअर्सची दर्शनी किंमत समान आहे. कंपनी P साठी बाजारभाव रु. 150 असून लाभांश 8% आणि कंपनी Q साठी बाजारभाव रु. 200 असून लाभांश 15 % आहे .

रीत :

कंपनी **P:** लाभांश **8%,** बाजारभाव = रु. **150**

$$\text{परताव्याचा दर} = \frac{\text{लाभांश}}{\text{बाजारभाव}} \times 100$$

$$= \frac{8}{150} \times 100$$

$$= 5.33\% \quad \ldots (1)$$

कंपनी **Q:** लाभांश **15%,** बाजारभाव = रु.**200**

$$\text{परताव्याचा दर} = \frac{\text{लाभांश}}{\text{बाजारभाव}} \times 100$$

$$= \frac{15}{200} \times 100$$

$$= 7.5\ \% \quad \ldots (2)$$

(1) आणि (2),

कंपनी Q मधील गुंतवणूक अधिक फायदेशीर आहे

उत्तर. कंपनी A मधील गुंतवणूक फायदेशीर आहे

Q. 10) पुढील शेअर खरेदी - विक्रीच्या विवरण पत्रातील रिकाम्या जागा भरा

(B – विकत घेतले **, S** – विकले **)**

शेअर्स	शेअर्सचा	शेअर्सची	दलालीचा	दलालीवर	दलालीवर	शेअर्स ची

संख्या	बाजारभाव	किंमत	0.2%	CGST 9%	SGST 9%	एकूण किंमत
100 B	रु. 45					
75 S	रु. 200					

रीत :

(1) (i) खरेदी केलेल्या शेअर्सची संख्या = 100; बाजारभाव = रु. 45

शेअर्सची किंमत = शेअर्सची संख्या x बाजारभाव

= 100 x 45

= रु. 4500

(ii) दलाली रक्कम = बाजारभावाच्या 0.2%

= 4500 x 0.2

$= 4500 \times \frac{2}{100}$

= रु. 9

(iii) दलालीवर CGST = दलाली रक्कम × CGST दर

$= \frac{9}{100} \times 9$

= रु. 0.81

(iv) SGST = CGST = रु. 0.81

(v) 100 शेअर्सची एकूण किंमत

= बाजारभाव + दलाली + CGST + SGST

= (4500 + 9 + 0.81 + 0.81)

= 4510.62

(2) (i) विकलेल्या शेअर्सची संख्या = 75;

बाजारभाव = रु. 200

शेअरची किमत = शेअर्सची संख्या x बाजारभाव

= 75 x 200 = रु. 15,000

(ii) दलाली रक्कम 0.2%= शेअरची किंमत x बाजारभाव

$= 15000 \times \frac{0.2}{100}$

= रु. 30

(iii) दलालीवरील CGST = दलाली रक्कम × CGST चा दर

$= CGST = \frac{9}{100} \times 30$

= रु. 2.70

(iv) SGST = CGST = रु. 2.70

(v) शेअरची विक्रीची किंमत = शेअरची एकूण किंमत - दलाली + CGST + SGST

= [15,000 – (30 + 2.70 + 2.70)]

= (15000 – 35.40)

= 14964.60

शेअर्स संख्या	शेअर्सचा बाजारभाव	शेअर्सची किंमत	दलालीचा 0.2%	दलालीवर CGST 9%	दलालीवर SGST 9%	शेअर्स ची एकूण किंमत
100 B	रु. 45	रु. 4500	रु. 9	रु. 0.81	रु. 0.81	रु. 4510.62
75 S	रु. 200	रु. 15000	रु. 30	रु. 2.70	रु. 2.70	रु. 14964.60

Q. 11) मिस्टर डिसोझा यांनी रु. 40 दर्शनी किंमतीचे 150 शेअर्स रु. 50 अधिमूल्यावर खरेदी केले. त्यावर कंपनीचे 60 % लाभांश दिला . लाभांश मिळाल्यावर त्यातील 120 शेअर्स रु. 10 अवमूल्याने विकले व उरलेले शेअर्स रु. 50 अधिमूल्याने विकले . प्रत्येक व्यवहारात रु. 25 दलाली दिली. तर त्यांना या व्यवहारात नफा झाला का तोटा ? किती रुपये ?

रीत :प्रथम मिस्टर डिसोझा यांनी गुंतवलेली एकूण रक्कम काढू.

त्यांनी रु. 40 दर्शनी किंमतीचे 150 शेअर्स रु. 50 अधिमूल्याने घेतले आहेत .

खरेदी करतानाचा बाजारभाव = दर्शनी किंमत + अधि मूल्य

= 40+50 = रु. 90

श्री . डिसोझा यांनी रु. 90 बाजारभावाने 150 शेअर्स खरेदी केले

त्यांची गुंतवणूक = बाजारभाव × शेअर्सची संख्या

= 90 × 150 = रु. 13500

त्यांना शेअर खरेदी करताना द्यावी लागलेली दलाली = रु. 25

श्री. डिसोझा यांचा एकूण खर्च = 13500 + 25 = 13525 ..... **1.**

आता त्यांना या व्यवहारात किती रक्कम मिळाली ते काढू

त्यांना **60%** दराने लाभांश मिळाला

1 शेअर वर मिळालेला लाभांश = दर्शनी किंमत × लाभांशाचा दर

$= 40 \times \frac{60}{100} = 24$

1 शेअरवर मिळालेला लाभांश = रु. 24

150 शेअरवर मिळालेला एकूण लाभांश = 150 $\times 24 = 3600$ **2**

श्री. डिसोझा यांनी 120 शेअर्स रु. 10 अवमूल्याने विकले

या व्यवहारातील बाजारभाव = दर्शनी किंमत - अवमूल्य

= 40 -10 = रु. 30

श्री. डिसोझा यांना 1 शेअर विकून रु. 30 मिळतील

श्री . डिसोझा यांना 120 शेअर्स विकून मिळालेली रक्कम

= 1 शेअरचा बाजारभाव × 120

= 30 × 120 = 3600

श्री. डिसोझा यांना दलाली वजा जाता मिळालेली रक्कम = 3600 - 25 = रु. 3575...... 3

उरलेले 30 शेअर्स त्यांनी रु. 50 अधिमूल्याने विकले

या व्यवहारातील बाजारभाव = दर्शनी किंमत + अधि मूल्य

=40+50= 90

डिसोझा यांना या भावाने 30 शेअर्स विकून मिळालेली रक्कम = 30 × 90 = 2700

परंतु या व्यवहारात देखील त्यांना रु. 25 दलाली द्यावी लागली

त्यांना मिळालेली रक्कम = 2700 - 25 = रु. 2675 4

डिसोझा यांना मिळालेली एकूण रक्कम

= 3600 + 3575 + 2675 = रु. 9850

परंतु सुरवातीला त्यांनी रु. 13,500 खर्च केले होते त्यांनी खर्च केलेली रक्कम त्यांना मिळालेल्या एकूण रक्कमे पेक्षा अधिक आहे .

डिसोझा यांना या व्यवहारात तोटा झाला .

डिसोझा यांना झालेला तोटा = 13500 - 9850= रु. 3650

उत्तर : या व्यवहारात श्री . डिसोझा यांना रु. 3650 तोटा झाला .

Q. 12)

रु. 35,000 किंमतीच्या एका वस्तूवर व्यापाऱ्याने 8% सूट देऊन उरलेल्या रकमेवर 28% GST आकारला. तर एकूण बिल किती रुपयांचे असेल ? त्यात CGST व SGST शीर्षकाखाली किती रक्कम असायला हवी ?

रीत : येथे प्रथम सूट काढू

वस्तूची छापील किंमत रु. 35,000 आहे.

या किंमतीवर व्यापाऱ्याने 8% सूट दिली

सूट = $= \frac{8}{100} \times 35000 = \text{रु.}\, 2,800$

ही सूट छापील किंमतीतून वजा करू .

करपात्र किंमत = रु. (35000-2800) = रु. 32,200

वस्तू व सेवा कराचा GST चा दर = 28%

GST = $\frac{28}{100} \times 32,200 = \text{रु.}\, 9,016$

बिलावरील एकूण रक्कम = करपात्र + GST

= रु. (32200 +9016) = रु. 41,216

CGST = SGST = 14% (Half of GST)

GST = रु. 9016

CGST = SGST = $\frac{1}{2} \times 9016 = \text{रु.}\, 4508$

उत्तर . एकूण बिल रु.32,200 चे असेल , त्यात **GST** रु.9016 आणि **SGST** रु.4508 असे कर असतील

Q. 13

श्री अशोक यांनी रु. 125000 करपात्र किमतीचे सोलार ऊर्जा संच विकत घेतले व 90,**000** रुपयांना विकले . वस्तू व सेवा कराचा दर 5 % असल्यास त्यांना या व्यवहारात किती रुपयांची वजावट व किती रुपये कर भरावा लागेल **?**

रीत:

श्री अशोक यांचा आऊटपुट टॅक्स

$= \frac{5}{100} \times 125000$

= रु. **6250**

श्रीमती मल्होत्रा यांचा इनपुट टॅक्स

= करपात्र किमत × **GST** चा दर = रु. **4500**

ITC = इनपुट टॅक्स = रु. **4500**

श्रीमती मल्होत्रा यांचा देय **GST payable** = आऊटपुट टॅक्स – **ITC**

= रु. **(6250 – 4500)**

= रु. **1750**

उत्तर . श्रीमती मल्होत्रा यांना 4500 रुपयांची **ITC** मिळेल आणि त्यांचा देय जीएसटी रु. 1750 आहे

Q. 14) प्रणव तिवारी यांनी रु. 12,000 करपात्र किमतीचा एक व्हॅक्यूम क्लीनर वसई येथील एका व्यापाऱ्यास 28% **GST** दराने विकला . वसईतील व्यापाऱ्याने ग्राहकास तो व्हॅक्यूम क्लीनर रु. 18,**200** करपात्र किंमतीस विकला . तर या व्यवहारातील पुढील किमती काढा .

(1) प्रणव तिवारी नी दिलेल्या करबीजकातील केंद्राचा व राज्याचा कर किती रुपये दाखवला असेल**?**

(2) वसई च्या व्यापाऱ्यानेग्राहकास केंद्राचा व राज्याचा किती कर आकारला असेल **?**

(3) वसईच्या व्यापाऱ्यासाठी शासनाकडे कर भरणा करताना केंद्राचा देय कर व राज्याचा देय कर किती येईल ते काढा.

रीत**:**

अण्णा पाटलांचा आउटपुट टॅक्स = करपात्र किमत **x GST** चा दर

$= \quad 12000 \times \frac{28}{100} =$ रु. **3360**

अण्णा पाटिल यांचा देय केंद्राचा कर (**CGST**)

$\text{CGST} = \frac{1}{2} \times$ एकूण **GST**

$= \frac{1}{2} \times 3360$

= रु. **1680**

आणि **SGST = CGST =** रु. **1680**

अण्णा पाटील यांचा देय राज्याचा कर = रु. 1680 वसई च्या व्यापाऱ्याने गि-हाइकाला तो व्हॅक्यूम क्लीनर रु. 18,**200** विकला आहे .

वसईच्या व्यापाऱ्याचा आउटपुट टॅक्स

= करपात्र किमत × GST चा दर

$$= 18200 \times \frac{28}{100}$$

$$= 5096$$

वसईच्या व्यापाऱ्याने आकारलेला CGST

$= \frac{1}{2} \times GST$ = 2548

त्याने आकारलेला राज्याचा कर (SGST) = 2352

वसईच्या व्यापाऱ्याचा देय GST = आउटपुट टॅक्स - ITC

= 5096 - 3360

= रु. 1736

वसईच्या व्यापाऱ्याचा देय कर CGST = देय SGST

$= \frac{GST}{2} = \frac{1736}{2}$ =868

उत्तर .

(1) प्रणव तिवारी नी केंद्राचा व राज्याचा कर प्रत्येकी रु. 1680 भरला.

(2) वसईच्या व्यापाऱ्याने ग्राहका कडून केंद्राचा व राज्याचा आकारलेला कर प्रत्येकी रु. 2548 आहे

(3) वसईच्या व्यापाऱ्याचा देय CGST व SGST प्रत्येकी रु. 868 आहे

Q. 15

श्री. अविनाश यांनी रु. 100 दर्शनी किंमतीचे शेअर्स रु. 75 बाजारभाव असताना रु. 75177 गुंतवून खरेदी केले. या व्यवहारात त्यांनी 0.2% दलाली दिली. दलालीवर 18% दराने GST दिला, तर त्यांना 75177 रुपयांत किती शेअर्स मिळतील ?

रीत : श्री. आदित्य यांना एक शेअर विकत घेण्यासाठी एकूण किती रक्कम द्यावी लागली ते काढू .

प्रथम दलालीची रक्कम काढू .

दलाली = बाजारभाव $\times \frac{0.2}{100} = 75 \times \frac{0.2}{100} =$ रु. 0.15

दलाली वर द्यावा लागलेला GST $= 0.15 \times \frac{18}{100} =$ रु. 0.027

1 शेअरची खरेदी किमत = बाजारभाव+ दलाली+GST

= रु. (75+ 0.15 + 0.027)

= रु. 75.177

1 शेअर विकत घेण्यासाठी रु. 75.117 खर्च आला .

श्री. आदित्य यांनी घेतलेल्या एकूण शेअर्स ची संख्या

$= \frac{\text{गुंतवणूक}}{\text{1 शेअरची खरेदी किमत}}$

$= \frac{75117}{75.117}$

= 1000

उत्तर . श्री. अविनाश संघवी यांना 1000 शेअर्स मिळतील

Q. 16) अनिता परमार यांनी 100 रुपये दर्शनी किंमतीचे रु. 525 बाजारभावाचे 47 शेअर्स घेतले . तर त्यांनी एकूण किती रुपये गुंतवणूक केली ? त्या शेअर्स वरती 20% लाभांश घेतल्यावर रु. 600 बाजारभावाने ते विकले. प्रत्येक व्यवहारात 0.1% दलाली दिली , तर या व्यवहारात त्यांना किती टक्के नफा किंवा तोटा झाला तो काढा .

SOLUTION:

1 शेअर चा बाजारभाव = रु 525 , दलाली 0.1%

यावर द्यावी लागलेली दलाली $= 525 \times \frac{0.1}{100} =$ रु. 0.52

1 शेअर विकत घेण्यासाठीचा खर्च = बाजारभाव + दलाली

= (525 + 0.52)

= रु. 525.52

प्रत्येक शेअर्सवर लाभांश 20% आहे

अनिता परमार यांची एकूण गुंतवणूक = (525.52 – 20)

= रु. 505.52 …. (1)

विकलेला बाजारभाव = रु. 650, दलाली 0.1%

दलालीचा दर $= 600 \times \frac{0.1}{100} =$ रु. 0.60

अनिता परमार यांना 1 शेअर विकल्यावर मिळणारी रक्कम=(600–0.60) = ₹ 599.40

…. (2)

नफा = शेअर विकल्यावर मिळणारी रक्कम – गुंतवलेली रक्कम

= ₹ (599.4 – 505.52) …. [From (1) and (2)]

= ₹ 93.88

शेकडा नफा $= \frac{\text{नफा}}{\text{गुंतवणूक}} \times 100$

$= \frac{93.88}{505.52} \times 100$

= 18.57

= 18(जवळच्या पूर्णांकात)

उत्तर . श्रीमती अनिता परमार यांना झालेला शेकडा नफा 18 % आहे

Q. 17) एका शेअरचा बाजारभाव रु. 2000 असताना तो शेअर विकला व त्यावर 0.1% दलाली दिली, तर विक्रीनंतर मिळणारी रक्कम किती ?

रीत :बाजारभाव = रु. 2000, दलाली = 0.1%

∴ दलाली रक्कम = 0.1 % हा बाजारभाव

= 0.1100 × 2000

∴ दलाली रक्कम = रु. 2∴

विक्रीनंतर मिळणारी रक्कम = बाजारभाव – दलाली =

2000 – 2

= रु. 1998

उत्तर : विक्रीनंतर मिळणारी रक्कम रु. 1998 आहे

Q. 18) एका शेअरचा बाजारभाव रु. 500 आहे. तो खरेदी करताना 0.3% दलाली दिली, तर या शेअरची खरेदीची किंमत किती ?

रीत :

बाजारभाव = रु. 500, दलाली = 0.3%

शेअरची खरेदीची किंमत = बाजारभाव + दलाली

$= 500+500\times \frac{0.3}{100}$

= 500 + 5× 0.30 = 500 + 1.5= रु. 501.50

उत्तर . शेअरची खरेदीची किंमत रु. 501.50 आहे

Q. 19

श्रीमती शीला यांनी रु. 100 दर्शनी किंमतीचे शेअर्स , बाजारभाव रु. 45 असताना विकले तेव्हा त्यांना रु. 4489.40 मिळाले . दलालीचा दर 0.2% व दलाली वरील GST दर 18% आहे, तर त्यांनी किती शेअर्स विकले ते काढा

रीत :

शेअर्सची दर्शनी किंमत = रु. 100

बाजारभाव = रु. 45

शेअर्सची विक्रीची किंमत = रु. 4489.40

दलाली चा दर = 0.2%, GST दर = 18%

एका शेअर वरील दलाली रक्कम = बाजारभाव × दलालीचा दर

$$= \frac{0.2}{100} \times 45$$

= रु. 0.09

दलाली वरील GST = दलाली × GST चा दर

$$= \frac{18}{100} \times 0.09$$

= रु. 0.016

एका शेअरची विक्रीची किंमत = बाजारभाव – (दलाली + GST)

= 45 – (0.09 + 0.016)

= 45 – 0.106

= रु. 44.894

1 शेअर विकल्यावर रु. 44.894 =मिळतात

$$= \frac{\text{मिळालेली एकूण रक्कम}}{\text{शेअरची विक्रीची किमत}}$$

$$= \frac{4489.40}{44.894}$$

= 100

उत्तर . श्रीमती शीला यांनी 100 शेअर्स विकले

Q. 20 अरुण ने रु. 10 दर्शनी किंमतीच्या शेअरचा बाजारभाव रु. 65 असताना रु. 6526 गुंतवले. त्यावर 60 % लाभांश मिळाल्यानंतर रु. 45 बाजारभावाने सर्व शेअर्स विकून टाकले. प्रत्येक व्यवहारात 0.4 % दलाली दिली. तर या व्यवहारात त्यांना झालेला नफा किंवा तोटा किती हे काढण्यासाठी पुढील चौकटी भरा .

रीत :

येथे कराचा दर दिलेला नाही म्हणून शेअर्सच्या खरेदी - विक्रीच्या वेळी कराचा विचार केलेला नाही

(1) दर्शनी किंमत = रु. 10, बाजारभाव = रु. 65

प्रतिशेअर दलाली = $\frac{0.4}{100} \times 65 =$ रु. 0.26

एका शेअरची किंमत = 65 + 0.26 = रु. 65.26

शेअर्सची संख्या = $\frac{6026}{60.26} = 100$

(2) दर्शनी किंमत = रु. 10, बाजारभाव = रु. 45

प्रतिशेअर दलाली = $\frac{0.4}{100} \times 45 =$ रु. 0.18

एका शेअरची विक्री किंमत = 45 – 0.18 = रु. 44.82

100 शेअरची विक्री किंमत = 100 x 44.82 = रु. 4482

लाभांश = 60%

1 शेअरवरील लाभांश = $\frac{60}{100} \times 10 =$ रु. 6

100 शेअर्स वरील लाभांश = 6 x 100 = रु. 600

अरुण ने शेअर विक्रीचे व लाभांशाचे एकूण उत्पन्न = 4482+ 600 = रु. 5082

अरुण ने केलेली गुंतवणूक = रु. 6526

अरुण ला झालेला तोटा= 6526 – 5082= रु. 1444

उत्तर . अरुण ला खरेदी - विक्रीच्या व्यवहारात रु. **1444** तोटा झाला.

Q. 21

समजा, एका व्यापाऱ्याने गोळा केलेला जुलै महिन्यातील कर , त्याच्या परताव्याच्या रकमेपेक्षा कमी आहे. अशा वेळेस कर गणना कशी होते ?

उत्तर :

जर व्यापाऱ्याने गोळा केलेला कर त्याच्या परताव्याच्या करा पेक्षा कमी असेल तर तो व्यापारी गोळा केलेला कर स्वतः जवळ ठेवील आणी जेवढा फरक त्याला कमी मिळेल त्याची वजावट पुढच्या महिन्याच्या करातून वळती करून घेईल .

Q. 22) पुढील तक्ता योग्य संख्या किंवा शब्द लिहून पूर्ण करा

उदा. क्रं.	दर्शनी किमत	मूल्यप्रकार	बाजार भाव
1	रु. 100	सममूल्य	…
2	…	अधिमूल्य रु. 500	रु. 575
3	रु. 10	अवमूल्य	रु. 5

रीत :

1. जेव्हा शेअर सममूल्य असतो, तेव्हा त्याच्या बाजारभाव दर्शनी किंमती एवढाच असतो

∴ बाजारभाव = दर्शनी किंमत = रु. **100**

2. बाजारभाव = दर्शनी किंमत + अधिमूल्य

∴ **575** = दर्शनी किंमत + **500**

∴ दर्शनी किंमत = **575 – 500**

= रु. **75**

3. जेव्हा बाजारभाव दर्शनी किंमतीपेक्षा कमी असतो , तेव्हा तो शेअर अवमूल्यावर आहे असे म्हणतात

अवमूल्य = दर्शनी किमत - बाजारभाव

∴ **10 – 5 =** रु. **5** अवमूल्यावर

उदा. क्रं.	दर्शनी किंमत	मूल्यप्रकार	बाजार भाव
1	रु.100	सममूल्य	रु. **100**
2	रु. 75	अधिमूल्य रु. 500	रु. 575
3	रु. 10	अवमूल्य रु. **5**	रु. 5

Q. 23) बाजारभाव रु.80 होता तेव्हा अमोलने रु. 100 दर्शनी किंमतीचे 50 शेअर्स विकत घेतले. त्यावर्षी कंपनीने 20% लाभांश दिला,तर गुंतवणुकीवर मिळालेला परताव्याचा दर काढा .

रीत :

बाजारभाव = रु. 80, दर्शनी किमत = रु. 100,

शेअर्सची संख्या = 50, लाभांश दर = 20%

∴ अमोलने केलेली गुंतवणूक = शेअर्सची संख्या × बाजारभाव = 50 × 80

= रु. 4000

लाभांश हा दर्शनी किंमतीवर मिळतो . म्हणून एकूण दर्शनी किंमत काढू .

एकूण दर्शनी किंमत = एका शेअरची दर्शनी किंमत × शेअरची संख्या

= 100 × 50 =

रु. 5000

या एकूण दर्शनी किंमतीवर 20% दराने मिळालेला लाभांश काढू

एकूण लाभांश = 5000 × $\frac{20}{100}$ = 50 × 20

= रु. 1000

परताव्याचा दर = $\frac{\text{मिळालेला एकूण लाभांश}}{\text{एकूण गुंतवणूक}}$ × 100

= $\frac{1000}{4000}$ × 100

= 25%

उत्तर . अमोलच्या गुंतवणुकीवर परताव्याच्या दर 25% आहे

Q. 24) श्रीमती देशपांडे यांनी रु. 20,000 गुंतवून रु.5 दर्शनी किंमतीचे शेअर्स प्रत्येकी रु. 20 अधि मूल्य देऊन घेतले , तर त्यांना किती शेअर्स मिळतील ?

रीत :

दर्शनी किंमत = रु. 5, अधिमूल्य = रु. 20 आहे

गुंतवलेले पैसे = रु. 20,000

∴ शेअरचा बाजारभाव = दर्शनी किंमत + अधिमूल्य

= 5 + 20

∴ शेअरचा बाजारभाव = रु. 25

एकूण गुंतवणूक = शेअर्सची संख्या × बाजारभाव शेअर्सची संख्या = $\frac{\text{एकूण गुंतवणूक}}{\text{बाजारभाव}} = \frac{20000}{25}$

= 800

उत्तर . श्रीमती देशपांडे यांना 800 शेअर्स मिळतील .

Q.25) स्मिताने रु. 12,000 गुंतवून रु. 10 दर्शनी किंमतीचे शेअर्स रु. 2 अधिमूल्याने घेतले, तर तिला किती शेअर्स मिळतील हे काढण्यासाठी पुढील कृती पूर्ण करा

रीत :

दर्शनी किमत = रु. 10, अधि मूल्य = रु. 2

बाजार भाव = दर्शनी किंमत + अधिमूल्य

= 10 + 2

= रु. 12

शेअर्सची संख्या = $\frac{\text{एकूण गुंतवणूक}}{\text{बाजार भाव}}$

$= \frac{12000}{12}$

= 1000 शेअर्स

उत्तर . स्मिताला 1000 शेअर्स मिळतील

Q. 26) एका रिस्टवॉच बेल्टची करपात्र किमत रु. 586 आहे. GST चा दर 18% आहे . तर ग्राहकाला तो बेल्ट किती रूपायास मिळेल ?

रीत :

GST चा दर 18%

बेल्टची करपात्र किमत रु. 586 आहे

$= \frac{18}{100} \times 586$

= रु. 105.48

ग्राहकाला द्यावी लागणारी किमत

= करपात्र किमत + GST

= रु. 586 + रु. 105.48

= रु. 691.48

उत्तर . ग्राहकाला तो बेल्ट रु. 691.48 रुपयांना मिळेल

Q. 27) "टीपटॉप इलेक्ट्रॉनिक्स" ने एका कंपनीला दीड टनाचा व करासह रु. 51200 किंमतीचा एअर कंडिशनर पुरवला. एअर कंडिशनर वरील CGST चा दर 14% आकाराला. तर कर बीजकात पुढील बाबी किती दर्शवल्या असतील ते काढा

(1) SGST चा दर (2) एसीवरील GST चा दर

(3) एसीची करपात्र किंमत (4) GST ची एकूण रक्कम (5) CGST ची रक्कम (6) SGST ची रक्कम

रीत :

येथे CGST चा दर 14% आकारला आहे

(1) SGST चा एसी वरील कर 14%

(2) GST = 14% + 14% = 28%

एसी ची किंमत रु. 100 मानू , GST 28%

एसी वरील GST रु. 128

एसी ची किंमत GST मिळवून = रु. 51200

ratio $\frac{\text{एकूण किंमत}}{\text{कर पात्र किंमत}}$ ही सामायिक किंमत आहे

एकूण किंमत एसीची रु. 128,

करपात्र किंमत रु. 100.

एकूण एसीची किंमत रु. 51200, एसीची करपात्र किंमत रु. x. मानू

$$\frac{x}{51200} = \frac{100}{128}$$

एसीची करपात्र किंमत $= 51200 \times \frac{100}{128} =$ रु. 40000

(3) एसीची करपात्र किंमत = रु. 40,000

(4) एकूण किंमत

= बीजक मूल्य – करपात्र किंमत

= रु. (51200 – 40000)

= रु. 11,200

(5) CGST ची रक्कम $= \frac{\text{रु.}11200}{2} =$ रु. 5600

(6) SGST ची रक्कम = CGST ची रक्कम= रु. 5600

Ans.

(1) SGST चा दर 14%

(2) एसी वरील GST चा दर 28%

(3) एसीची करपात्र किंमत रु. 40,000

(4) GST ची एकूण रक्कम रु. 11,200

(5) CGST आणि SGST ची किंमत रु.5600

Q. 28

पुढे दिलेल्या माहितीवरून एका व्यापाऱ्याने दुसऱ्या व्यापाऱ्यासाठीचे **(B2B)** टॅक्स इन्व्हॉस तयार करा . नाव , पत्ता , तारीख इत्यादी तुमच्या पसंतीनुसार घ्या

पुरवठादार - नाव , पत्ता , राज्य , **GSTIN,** बिल क्रमांक व तारीख

प्राप्तकर्ता - नाव , पत्ता , राज्य , **GSTIN**

वस्तूंचा तपशील **: (1)** पेन्सिल बॉक्स **100, HSN – 3924, Rate – ₹ 20, GST 12%**

(2) जिग सॉ पझल्स **50, HSN 9503, Rate – ₹ 100, GST 12%**

रीत :

GST = 12%

CGST = SGST = 6%

Tax Invoice

SUPPLIER : Adage Enterprises 280B, 4/12, Gajjar Enclave, Mumbai : 400 030			**GSTIN : 27APICK8027H1Z5**	
To, **Ganesh** **Stores**	**Place of Delivery** **Ganesh** **Stores,** **Dadar,** **Mumbai 400 028**	**Invoice No.** **GST/500**	**Date : 01-Sep-2018**	
Description of Goods	**HSN Code**	**Quantity**	**Rate**	**Amount**
(1) पेन्सिल बॉक्स	3924	100	Rs. 20	Rs. 2000
(2) जिग सॉ पझल्स	9503	50	Rs. 100	Rs. 5000
Total				Rs. 7000

Less Discount				0
Taxable Value				Rs. 7000
Add :				
CGST 6%			6%	Rs. 420
SGST 6%			6%	Rs. 420
Total				**Rs. 7840**

Amount (in words) **Rupees Seven Thousand Eight Hundred and Forty Only**	
PAN : APICK8027H	**For Adage Enterprises Authorized Signature**

Q. 29) GST दर्शवणाऱ्या करबीजकाचा तक्ता मिस जॉर्ज ने दिलेला आहे

खरेदी	विक्री	कर दर
2,50,000	**8,00,000**	**9% SGST आणि CGST**

प्रत्येकाला इनपुट टॅक्सचा लाभ घेण्यासाठी त्याने सर्व अटींचे पालन केले आहे आणि त्यांचे देयक कर पुढीलप्रमाणे

सेवा	कर	व्याज
CGST	30,000	1500
SGST	30,000	1500

तर याचा CGST आणि SGST कर मिस जॉर्ज भरावा लागेल

रीत :

1. बाह्य पुरवठा आणि आवक पुरवठ्यावर कराची गणना:

तपशील	कर दर	**CGST**	**SGST**
आउटपुट टॅक्स Liability @ 18%	8,00,000	72,000	72,000
इनपुट टॅक्स @ 18%	2,50,000	22,500	22,500

2. पात्र असणाऱ्या लोकाची इनपुट टॅक्स गणना:

तपशील	**CGST**	**SGST**
खाते उघडताना रक्कम	30,000	30,000
आवक पुरवठ्यावर इनपुट टॅक्स	22,500	22,500
इनपुट टॅक्स रक्कम	52500	52500

3. एकूण भरावा लागणारा कर :

तपशील	**CGST**	**SGST**
बाह्य पुरवठ्यावरचा कर	72,000	72,000
मुख्यांकडून ठरवलेला इनपुट टॅक्स	(52,500)	(52,500)
एकूण कर देयक	19,500	19,500

Q. 30)समजा एका व्यापाऱ्याचा जुलै महिन्यातील गोळा केलेला कर व परताव्याची रक्कम समान आहे, तर देय कर किती येईल ?

रीत :

त्या व्यापाऱ्याला देय असलेला कर शून्य असेल . कारण त्याने आधी इनपुट कर भरलेला आहे आणि तेवढाच कर त्याने गोळा केला असेल , तर त्यातून त्याच्या कराचा परतावा वजा केल्यास त्याला भरावा लागणारा कर शून्य असेल

उत्तर. व्यापाऱ्याला भरावा लागणारा कर शून्य असेल.

Q. 31) चंदिगढ हे संघराज्य आहे. येथील मलिक गॅस एजन्सीने काही गॅस टाक्या **24,500** रुपयांना खरेदी केल्या व तेथील ग्राहकांना **26,500** रुपयांना विकल्या . या व्यवहारात 5 % दराने देय असलेला एकूण **GST** काढा व त्यावरून केंद्राचा देय कर व संघराज्याचा देय कर काढा

रीत :

मलिक गॅस एजन्सीने **24,500** रुपयांची खरेदी केली त्यावर त्यांनी 5% दराने **GST** भरला

मलिक गॅस एजन्सीचा इनपुट टॅक्स $= \frac{5}{100} \times 24500$

$= ₹\ 1225$

$\therefore$ मलिक गॅस एजन्सीचे **ITC** =₹ 1225 **...(1)**

मलिक गॅस एजन्सीने रु. **26500** रुपयांची विक्री केली

या विक्रीकर एजन्सीने 5% दराने **GST** गोळा केला आऊटपुट टॅक्स = **5%** रु. **26500**

आऊटपुट टॅक्स $= \frac{5}{100} \times 26500 =$ रु. **1325** **... (2)**

एजन्सीचा देय कर GST = आऊटपुट टॅक्स – ITC

= रु. (1325 – 1225)   … From (1) & (2)

= रु. 100

CGST = $\frac{1}{2}\times$ GST = $\frac{1}{2}\times 100$ = रु. 50

UTGST = $\frac{1}{2}\times$ GST = $\frac{1}{2}\times 100$ = रु. 50

उत्तर . मलिक गॅस एजन्सी देय GST रु. 100,

CGST रु. 50 and UTGST रु. 50

Q. 32) एका व्यापाऱ्याने पोलिस नियंत्रण कक्षासाठी वस्तू व सेवा करासह रु. 84,000 (with GST) किंमतीचे वॉकीटॉकी संच पुरवले . वस्तू सेवा कराचा दर 12%. असल्यास त्याने आकारलेल्या करतील केंद्रीय GST व राज्य GST काढा. वॉकीटॉकी संचाची करपात्र किंमत काढा

रीत :

GST चा दर = 12%.

वॉकीटॉकी संचाची करासहित किंमत रु. 100 मानू

एकूण किंमत = रु. 100 + रु. 12 (GST)

= रु. 112

वॉकीटॉकी संचाची किंमत रु. x आहे

$$\frac{100}{112} = \frac{x}{84000}$$

$$x = 100 \times \frac{84000}{112} = 75000$$

वॉकीटॉकी संचाची कर पात्र किंमत रु. 75,000

रु. 84000 ही करा सहित किंमत दिली आहे

केंद्राचा GST = रु. (84000 – 75000) = रु. 9000

केंद्राचा CGST = SGST = $\frac{1}{2} \times$ GST

$= \frac{1}{2} \times 9000$

= रु. 4500

उत्तर . वॉकीटॉकी संचाची करपात्र किंमत रु. 75,000 आणि त्यावर भरलेला केंद्राचा कर

व राज्याचा कर प्रत्येकी रु. 4500 आहे

Q. 33) जर रु. 100 दर्शनी किंमतीचे 300 शेअर्स रु. 30 अवमूल्यावर विकले , तर किती रुपये मिळतील

रीत : रु. 100 दर्शनी किंमतीच्या शेअरचे अवमूल्य रु. 30 दिले आहे

बाजारभाव = दर्शनी किंमत – अवमूल्य

= रु. (100 – 30)

= रु. 70

असे 300 शेअर विकले

300 शेअर्स विकून मिळणारी रक्कम

= शेअरची संख्या x बाजारभाव

= 300 x 70

= रु. 21,000

उत्तर . 300 शेअर्स विकून रु. 21,000 मिळतील

Q. 34)

श्री . बाटलीवाला यांनी एका दिवसात एकूण रु. **30,350** किमतीच्या शेअर्सची विक्री केली व रु.**69,650** किंमतीच्या शेअर्सची खरेदी केली. त्या दिवशीच्या एकूण खरेदी - विक्रीवर **0.1%** दराने दलाली व दलालीवर **18%** वस्तू व सेवा कर दिला . तर या व्यवहारात दलाली आणि वस्तू व सेवा करावरील एकूण खर्च काढा

रीत :

बाजारभाव = रु. **30,350**

दलाली =**0.1%**

दलाली = एकूण बाजारभाव रु. **30,350**

$= 30350 \times \frac{0.1}{100} =$ रु. **30.35** ... (1)

दलालीवर त्यांनी भरलेला **GST** काढू

GST$= 30.35 \times \frac{18}{100} =$ रु. $5.463 =$ रु. 5.46 ...(2) (2)शेअर्स वरील दलाली आणि

वस्तूसेवा कर काढू

रु. **69,650**

$= 69659 \times \frac{0.1}{100} =$ रु. **69.65** ... (3)

या दलाली वरील **GST** $= 69.65 \times \frac{18}{100} =$ रु. $12.537 =$ रु. 12.54 ... (4)

श्री . बाटलीवाला यांना करावा लागलेला एकूण खर्च = रु. **(30.35 + 5.46 + 69.65 + 12.54)** **[From (1) to (4)]**

= रु.

118

उत्तर . दलाली आणि वस्तू व सेवा करा वरील एकूण खर्च रु. 118 आहे

Q. 35

जल्पाला 50 शेअर्स घ्यायचे आहे. प्रत्येक शेअर्स युनिट मागे रु. 13.50 NAV आहे तर, जल्पाने किती गुंतवणूक केली . जर तिने रु. 324 ची गुंतवणूक केली तर तिला किती युनिट शेअर्स मिळाले ?

रीत:

1) एकूण गुंतवणूक = खरेदी केलेले शेअर्स x एका युनिट चे नकत मूल्य

= 50 units x रु. 13.50

= रु. 675

2) किती शेअर्स मिळाले

$= \frac{\text{एकूण गुंतवणूक}}{\text{एका युनिटचे नकत मूल्य}}$

$= \frac{324}{13.50}$

= 24 units

उत्तर . (1) एकूण केलेली गुंतवणूक रु. 675

(2) जर जल्पा ने रु. 324 गुंतवले तर तिला 24 शेअर्स मिळाले

Q. 36) सुरेश यांनी पुढील प्रमाणे काही कंपांनीच्या शेअर्स मध्ये गुंतवणूक केली

कंपनी A: दर्शनी किंमत रु. 100, बाजारभाव रु. 120, लाभांश 12%

कंपनी B: दर्शनी किंमत रु. 100, बाजारभाव रु. 90, लाभांश 8.1%

तर कोणती गुंतवणूक फायदेशीर आहे ?

रीत :

1) कंपनी A च्या गुंतवणुकीवर मिळालेला लाभांश :

लाभांश = दर्शनी किंमत x लाभांशाचा दर

= रु. 100 x 12%

$= 100 \times \frac{12}{100}$

= रु. 12

2) कंपनी B च्या गुंतवणुकीवर मिळालेला लाभांश:

लाभांश = दर्शनी किंमत x लाभांशाचा दर

= रु. 100 x 8.1%

$= 100 \times \frac{8.1}{100}$

= रु. 8.1

वरील किंमतीवरून असे लक्षात येते की , कंपनी A चा लाभांश हा कंपनी B पेक्षा जास्त आहे

उत्तर .: कंपनी A मध्ये केलेली गुंतवणूक फायदेशीर आहे

Q. 37) एका कुरीयरवाल्याने रु. 600 च्या करावर रु. 108 GST लावला.तर त्याने किती टक्के GST दर लावला

रीत :

GST रक्कम रु. 108 आणि कर देयक रक्कम रु. 600

GST दर $= \frac{GST\ \text{रक्कम}}{\text{कराची रक्कम}} \times 100$

$= \frac{108}{600} \times 100$

$= 18\%$

उत्तर . GST दर 18% आहे

Q. 38) एका व्यापाऱ्याने जुलै महिन्यात रु. 30,000 GST गोळा केला . त्याचे ITC रु. 22,000 असेल , तर त्याचा देय CGST किती ?

रीत :

गोळा केलेला GST कर = रु. 30,000

महिन्याचा ITC = रु. 22,000

देय GST

= गोळा केलेला GST – महिन्याचा ITC

= रु. 30,000 – रु. 22,000

= रु. 8,000

एकूण GST = CGST + SGST

CGST = GST – SGST ... (1)

CGST = SGST = $\frac{1}{2} \times$ GST

(1) मध्ये किंमती ठेवू

CGST = $\frac{1}{2} \times 8000$

= रु. 4,000

उत्तर . व्यापाऱ्याला देय CGST रु. 4,000 आहे

Q. 39) रु. 100 दर्शनी किंमतीवर 9% लाभांश दर ठरला असता परतीचा दर हा 7.5% असेल तर बाजार किंमत काढा आणि रु. 8400 च्या गुंतवणुकीवर किती शेअर्स मिळतील ?

रीत:

लाभांश दर = 9%; FV = दर्शनी किंमत रु. 100

परतीचा दर = 7.5%

दिलेल्या माहिती नुसार ,

परतीचा दर × बाजारभाव = लाभांश दर × दर्शनीकिंमत

बाजारभावाला x मानू

7.5% x x = 9% x रु. 100

$$\frac{7.5}{100} \times x = \frac{9}{100} \times 100$$

$\frac{7.5x}{100} = 9$

$7.5x = 9 \times 100$

$7.5x = 900$

$x = \frac{900}{7.5}$

$x = 120$

शेअर्सचा बाजारभाव रु. 120

(2) रु. 8400 मध्ये एकूण किती शेअर्स मिळतील

शेअर्स संख्या = $\frac{\text{एकूण गुंतवणूक}}{\text{बाजारभाव}}$

$= \frac{\text{रु.}8400}{\text{रु.}120}$

= 70

उत्तर . (1) बाजारभाव किंमत रु. 120

(2) एकूण 70 शेअर्स खरेदी केले जातील रु. 8400 च्या गुंतवणुकीवर

Q. 40) रु. 50 दर्शनी किंमत असलेले रु. 20 शेअर्स सम मूल्यावर खरेदी केले . तर त्यासाठी किती रक्कम गुंतवावी लागेल ? जर ते शेअर्स रु. 2 रुपये अव मूल्यावर असते तर किती रक्कम कमी गुंतवावी लागली असती ?

रीत :

1) गुंतवावी लागणारी रक्कम :

शेअर्स हे सममूल्यावर खरेदी केले असल्याने त्यांचा खरेदी किंमत ही दर्शनी किंमत एवढी रु. 50 आहे

गुंतवलेली रक्कम = दर्शनी किंमत x शेअर्स खरेदी संख्या

= रु. 50 x 20 shares

= रु. 1000

(2) जर शेअर्स ₹ 2 कमी किंमतीने घेतले तर शेअर्स ची किंमत किती

= रु. 50 – रु. 2

= रु. 48

गुंतवणूक = रु. 48 x 20 शेअर्स

= रु. 960

कमी झालेली रक्कम = रु. 1000 - रु. 960

= रु. 40

उत्तर . (1) शेअर्स खरेदी करण्यासाठी रु. 1000 गुंतवले

(2) जर शेअर्स रु. 2 ने कमी खरेदी केले तर रु. 40 गुंतवावे लागतील

Q. 41) नवलने रु. 1000 गुंतवणूक40 शेअर्स खरेदी केले. जर दलाली दर रु. 1.50 असेल तर त्या वेळी त्या शेअर्स चा बाजार भाव किती होता

रीत:

एकूण गुंतवणूक = रु. 1000; शेअर्स संख्या = 40

दलाली = रु. 1.50

शेअर्स किंमत = $\frac{\text{एकूण गुंतवणूक}}{\text{शेअर्स संख्या}}$

$= \frac{\text{रु.}1000}{40\ Shares}$

= रु. 25

बाजारभाव = शेअर्स किंमत - दलाली

= रु. 25 - रु. 1.50

= रु. 23.50

उत्तर . बाजारभाव रु. 23.50 इतका होता

Q. 42)एका किरकोळ व्यापाऱ्याने घाऊक विक्रेत्या कडून सीसी टीव्ही खरेदी केले ज्याने ती निर्मात्या कडून खरेदी केली होती. प्रत्येक व्यवहारात संबंधित विक्रेत्याने 18% GST लावला . किरकोळ व्यापाऱ्याने 25% नफा कमवला. किरकोळ व्यापाऱ्याने या व्यवहारासाठी रु. 51344.75 भरले असल्यास निर्मात्यास किती मूळ किंमत लागेल ?

रीत :

निर्मात्याची मूळ किंमत रु.x मानू

निर्मितीसाठी लागणारा GST = $18\%\ of\ x$

$$= \frac{18}{100} \times x$$

$$= \frac{18x}{100}$$

निर्मात्याने विकलेली किंमत = रु. $\left(x + \frac{18x}{100}\right)$

$$= \text{रु. } \frac{118x}{100}$$

किरकोळ व्यापारी :

किरकोळ व्यापारी किंमत = रु. $\frac{118x}{100}$

नफा व्यापारी = 25% of $\frac{118x}{100}$

$$= \frac{25}{100} \times \frac{118x}{100}$$

$$= \frac{1}{4} \times \frac{118x}{100}$$

$$= \text{रु. } \frac{118x}{400}$$

सीसीटीव्ही ची नफा सहित किंमत = रु. $\left(\frac{118x}{100} + \frac{118x}{400}\right)$

GST = 18% of रु. $\left(\frac{118x}{100} + \frac{118x}{400}\right)$

$$= \frac{18}{100} \text{ x } \left(\frac{118x}{100} + \frac{118x}{400}\right)$$

व्यापाऱ्याची विक्री = नफा सहित रक्कम + GST

$$51344.75 = \left(\frac{118x}{100} + \frac{118x}{400}\right) + \left(\frac{18}{100}\right)\left(\frac{118x}{100} + \frac{118x}{400}\right)$$

$$51344.75 = \left(\frac{118x}{100} + \frac{118x}{400}\right)\left(1 + \frac{18}{100}\right)$$

$51344.75 = \frac{590}{400} \times \frac{118}{100} \times x$

51344.75 = 1.7405 x x

$x = \frac{51344.75}{1.7405}$

x = रु. 29,500

उत्तर.निर्मात्याची सीसीटीव्हीची मूळ

रक्कम रु. 29,500

Q.43) सरस्वती महाविद्यालयाने त्यांच्या प्रयोग शाळे साठी संगणक खरेदी केले तर त्यांना 10% सवलत संगणकाच्या छापील किंमतीवर देण्यात आली, GST आकाराला जाणारा दर 18% होता. संगणकाची खरेदी किंमत रु.47,790 आहे तर संगणकाची छापील किंमत काढा

रीत :संगणकाची छापील किंमत रु. x मानू

सवलत = 10% छापील किंमतीवर

$= \frac{10}{100} \times x$

= रु. 0.1x

कर किंमत = छापील किंमत - सवलत

$= x - 0.1x$

= रु. 0.9 x

GST दर = 18%

GST = 18% कर किंमत

= $\frac{18}{100} \times 0.9x$

= रु. $0.162x$

खरेदी किंमत = कर दर + GST

47790 = $0.9x + 0.162x$

47790 = $1.062x$

$x = \frac{47790}{1.062}$

x = रु. 45000

उत्तर . संगणकाची छापील किमत रु. 45,000

Q. 44) क्रीडा साहित्यात व्यवहार करताना मुंबईतील एका व्यापाऱ्याने चंदिगडमधून रु. 35,000 ची क्रीडा साहित्य खरेदी केली या व्यवहारासाठी त्याने IGST 12% भरले त्या बदल्यात त्याने ही सामग्री मुंबईतील ऑल राऊंडर क्रिकेट क्लबला रु. 70,400 मध्ये विकली. या किंमतीमध्ये 12% GST म्हणून रु. 6,600 दिले. या माहितीच्या आधारे व्यापाऱ्यास द्‍यावी लागणारी GST काढा .

रीत :

इनपुट व्यापाऱ्याचा टॅक्स

= 12% टॅक्स 35000

= $\frac{12}{100} \times 35000$

= रु. 4200

मुंबईतील व्यापाऱ्याने GST साठी रु. 4200 दिले

आउटपुट टॅक्स = रु.6,600

SGST = CGST = $\frac{6600}{2} = रु. 3,300$

पण व्यापऱ्याने आधीच केंद्र सरकारचा कर GST रु. 4200 दिला आहे

केंद्र सरकारला द्यावा लागणारा कर = 3300 - 3300 = रु. 0

रु. 4200 एकूण करापैकी रु. 3300 कर आधीच केंद्र सरकारला दिला आहे

राहिलेला शिल्लक कर = 4200 - 3300 = रु. 900

SGST कर = 3300 - 900 = रु.2400

उत्तर . व्यापाऱ्यास भरावा लागणारा कर रु. 2400

Q. 45) श्री . जोशी यांनी रु. 100 दर्शनी किंमतीचे 125 शेअर्स खरेदी केले त्याचा बाजारभाव रु. 90 आहे. पहिल्या वर्षात 20% लाभांश दुसऱ्या वर्षात 15% लाभांश घेतल्या नंतर हे शेअर्स रु.105 ह्या बाजार भावाने विकले . हे विक्रताने ह्याच्या व्यवहारासाठी त्याने प्रत्येकी शेअर्स मागे 50 पैसे दलाली दिली तर ह्या व्यवहारमध्ये नफा झाला कि तोटा ?

रीत :शेअर्स खरेदी करण्यासाठी

दर्शनी किंमत = रु. 100, बाजारभाव = रु. 90, शेअर्स संख्या = 125

गुंतवणूक = बाजारभाव x शेअर्स संख्या

= 90 x 125

= रु. 11,250

दलाली = 50 पैसे

दलाली = 0.5 x 125

= रु. 62.5

125 शेअर्सची खरेदी किंमत = 11250 + 62.5

= रु. 11312.50

शेअर्स विकताना :

पहिल्या वर्षाचा लाभांश = 20% दर्शनी किंमत

$= \frac{20}{100} \times 100$

= रु. 20

125 शेअर्सचा लाभांश = 20 x 125 = रु. 2500

दुसऱ्या वर्षाचा लाभांश = 15% दर्शनी किंमत

$= \frac{15}{100} \times 100$

= रु. 15

125 शेअर्स लाभांश = 15 x 125 = रु. 1875

एकूण लाभांश = रु. (2500 + 1875) = रु. 4375

दलाली = 50 पैसे प्रत्येक एका शेअर्सचे

एकूण दलाली = 0.5 x 125 = रु. 62.5

बाजार भाव 125 शेअर्स = 125 x 105 = रु. 13,125

विक्री किंमत = लाभांश + बाजार भाव 125 शेअर्स - दलाली

= 4375 + 13125 - 62.50

= रु. 17437.50

विक्री किंमत > खरेदी किंमती पेक्षा

नफा = विक्री किंमत - खरेदी किंमत

= 17437.50 - 11312.50

= रु. 6125

उत्तर : श्री जोशी यांनी ह्या व्यवहारात ₹ 6125 नफा मिळाला

46) श्रीमती.अरुणा ठक्कर यांनी एका कंपनीचे ₹ 100 दर्शनी किमतीचे 100 शेअर्स ₹1200 बाजार भावाने विकत घेतले. प्रतिशेअर 0.3% दलाली व व दलाली वर 18% GST दिला, तर

i. शेअर्ससाठी एकूण गुंतवणूक किती रुपये केली ?

ii. गुंतवणुकीवर दलाली किती दिली ?

iii. दलाली वरील GST काढा ?

iv. 100 शेअर्स साठी एकूण किती रुपये खर्च झाले ?

रीत :

दर्शनी किंमत = रु.100, शेअर्सची संख्या = 100,

बाजार भाव = रु. 1200

दलाली = 0.3%, GST = 18%

i. शेअर्सचा बाजार भाव = शेअर्सची संख्या x बाजार भाव

= 100 x 1200

= रु. 1,20,000

∴ शेअर्स साठी एकूण गुंतवणूक रु. 1,20,000

ii. या गुंतवणुकीवर 0.3% दलाली दिली आहे

$= \frac{0.3}{100} \times 120000$

= रु. 360

∴ दलाली रु. 360 दिली आहे

iii. दलाली वर 18% दराने GST दिला आहे

$$= \frac{18}{100} \times 360$$

= रु. 64.80

∴ दलाली वर रु. 64.80 GST भरला आहे

iv. 100 शेअर्ससाठी झालेला खर्च

= बाजारभाव + दलाली + GST

= 120000 +360 + 64.80

= रु. 1,20,424.80

∴ 100 शेअर्स साठी झालेला खर्च रु. 1,20,424.80 आहे

उत्तर .

i. शेअर्स साठी एकूण गुंतवणूक रु. 1,20,000

ii. दलाली रु. 360 दिली आहे

iii. दलाली वर रु. 64.80 GST भरला आहे

iv. 100 शेअर्स साठी झालेला खर्च रु. 1,20,424.80 आहे

47) एका शेअर्सची दर्शनी किंमत रु.200 आहे आणि बाजारभाव हा रु.275 आहे. तर शेअर्स सवलत दरात खरेदी केले का जास्त पैसे भरावे लागतील ते शोधा आणि त्यावर किती सवलत मिळाली ते काढा

रीत :दर्शनी किंमत = रु. 200, बाजार भाव

= रु. 275

जर शेअर्सची किंमत दर्शनी किंमती पेक्षा जास्त असेल तर जादा पैसा भरावे लागतील

वरील माहिती वरून ,

शेअर्सची किंमत = बाजार भाव

शेअर्स किंमत > दर्शनी किंमत

जादा भरावा लागणारे पैसे

जादाचे पैसे = बाजार भाव - दर्शनी किंमत

= रु. 275 - रु. 200

= रु. 75

उत्तर . शेअर्स साठी जादा भरावे लागणारे पैसे रु. 75

48) श्री . रोहित हे किरकोळ विक्रेते आहेत किरकोळ खरेदीच्या वेळी त्यांनी रु. 6500 एवढा GST भरला विक्रीच्या वेळी त्याने रु. 8000 GST गोळा केला

i. त्यांचा इनपुट आणि आउटपुट टॅक्स शोधा

ii. त्यांचे इनपुट टॅक्स क्रेडिट काय आहे

iii. त्यांचा GST देय काढा

iv. त्यांची CGST आणि SGST देय काढा

उत्तर :

भरलेला GST = रु. 6500

गोळा केलेला GST = रु. 8000

i. इनपुट टॅक्स = GST भरलेला = रु. 6500

आउटपुट टॅक्स = GST गोळा केलेला = रु. 8000

ii. इनपुट टॅक्स क्रेडिट = इनपुट टॅक्स = रु. 6500

iii. देय GST = आउटपुट टॅक्स - इनपुट टॅक्स क्रेडिट

= रु. 8000 - रु. 6500

= रु. 1500

iv. CGST = SGST = $\frac{1}{2} \times \text{GST}$

= $\frac{1}{2} \times \text{रु.}\, 1500$

= रु. 750

49) एका म्युच्युअल फंड योजनेत 200 कोटी रुपयांची 8 कोटी युनिट्स केली असतील तर त्यांच्या एका युनिटचे नकत मालमत्ता मूल्य किती ?

रीत : एका युनिटचे नकत मूल्य = $\frac{\text{एकूण बाजार मूल्य}}{\text{युनिटची संख्या}}$

= $\frac{\text{रु.}200}{8\ Units}$

= ₹ 25

उत्तर .: एका युनिटचे नकत मालमत्ता मूल्य (NAV) रु. 25 असेल

50) श्री जे यांनी रु. 8000 करपात्र मूल्य असणारे एक द्रव्य साबण विकत घेतला आणि ग्राहकांना कर पात्र मूल्य रु. 10000 दराने विकला. GST दर 18% आहे तर श्री जे यांचा देय SGST आणि CGST दर काढा .

रीत : खरेदी करताना GST

GST = करपात्र मूल्य x GST दर

= रु. $8000 \times \frac{18}{100}$

= रु. 1440

इनपुट GST दर = रु. 1440

ii. <u>विक्री करताना GST</u>:

GST = करपात्र मूल्य x GST दर

= रु. $10000 \times \frac{18}{100}$

= रु. 1800

आऊटपुट GST दर = रु. 1800

एकूण GST = GST आऊटपुट - GST इनपुट

= रु. 1800 - रु. 1440

= रु. 360

CGST = SGST = $\frac{1}{2} \times$ GST

= $\frac{1}{2} \times$ रु. 360

= रु. 180

उत्तर : श्री जे केमिकल्स यांनी भरावा लागणारा CGST आणि SGST रु. 180 असेल